**निवेदन**
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक
# संघर्षाचा आवाज
प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...
पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र
संपादक : संजय सोनवणे
■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in
■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०८ वा ■ सोमवार दि.१४ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – ०४

क्रीडा कोट्यातून सरकारी नोकरी... पान २ वर | भारतीय लोकशाही आणि... पान ३ वर | अपर मुख्य सचिव (सेवा)... पान ४ वर

## कंत्राटी कामगारांना योग्य उपचार मिळत असेल तर चौकशीची गरज नाही; पण चौकशीसाठी गेल्यावर हॉस्पिटलच्या सिक्युरिटी व बाउन्सर्सकडून गैरवर्तन व खोटे आरोप करून अडथळा निर्माण करणे योग्य नाही - शरद भाकरे

**पुणे** : कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्याच्या अधिकृत प्रतिनिधींना भारती हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या संघटनेच्या सभासदाची विचारपूस करण्यास अडथळा निर्माण करणे, सिक्युरिटी व बाउन्सर्सकडून गैरवर्तन व खोटे आरोप करणे तसेच संघटनेच्या प्रतिनिधींच्या सुरक्षिततेसाठी तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याबाबत दि.१०/९/२०२६ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, भारती विद्यापीठ विभाग यांना कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्याच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. ते म्हणतात की, कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्य ही कामगारांच्या हक्कांसाठी व त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी कार्यरत असलेली संघटना आहे. आमच्या संघटनेच्या सभासद सौ.लक्ष्मी साबळे या सध्या भारती हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सदर सभासद यांनी संघटनेला अधिकृत Authorization Latter दिलेले असून, त्यांच्या वतीने आवश्यक त्या प्रशासकीय, ESIC संदर्भातील तसेच पोलीस प्रशासनाशी संबंधित बाबींमध्ये पाठपुरावा करण्याची जबाबदारी संघटनेवर सोपविण्यात



आलेली आहे. सदर सभासदांच्या उपचारासंदर्भात चार दिवस उलटूनही Approval प्राप्त झालेला नसल्याची माहिती मिळाल्याने, संघटनेच्या वतीने आम्ही त्यांच्या प्रकृतीची व उपचाराची विचारपूस करण्यासाठी भारती हॉस्पिटलमध्ये गेलो होतो.

मात्र, हॉस्पिटलमध्ये पोहोचल्यानंतर सिक्युरिटीचे इन्चार्ज श्री.माने व श्री.कांबळे यांनी आमचा मार्ग अडवून आम्हाला वर जाण्यास बंदी असल्याचे सांगितले. सदर बंदी कोणत्या आदेशाने व कोणत्या कारणास्तव घालण्यात आली आहे, याबाबत आम्ही त्यांना स्पष्टपणे विचारले. तसेच, जर संघटनेच्या प्रतिनिधींना प्रवेशबंदी केली असेल तर त्याबाबतचे लेखी आदेश आम्हाला द्यावेत, अशी मागणी केली.

परंतु संबंधितांनी आम्हाला कोणतेही लेखी कारण अथवा आदेश देण्यास स्पष्टपणे नकार दिला व आम्ही लेखी उत्तर देऊ शकत नाही असे सांगितले. अशा परिस्थितीत आमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व पुढे आमच्यावर कोणतेही चुकीचे आरोप होऊ नयेत म्हणून आम्हाला संपूर्ण घटनाक्रमाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यास नाईलाज झाला. त्यानंतर हॉस्पिटल प्रशासनाचे बाउन्सर्स मोठ्या संख्येने तेथे जमा झाले व आमच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यामध्ये एका महिला बाउन्सरकडून आमचा व्हिडिओ काढण्यात येत होता आणि व्हिडिओ काढताना आमच्यावर तुम्ही कमिशन एजंट आहात अशा प्रकारचे गंभीर व अपमानास्पद आरोप करण्यात आले. संघटनेच्या अधिकृत प्रतिनिधींवर अशा प्रकारे कोणताही आधार नसताना आरोप करणे हे अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह आहे.

आम्ही वारंवार स्पष्ट केले की, सौ.लक्ष्मी साबळे यांनी आम्हाला अधिकृत Authorization Latter दिलेले आहे आणि आम्ही त्यांच्या वतीने केवळ त्यांची भेट घेऊन त्यांच्या उपचारांची व ESIC Approval ची माहिती घेण्यासाठी आलो आहोत. आमचा कोणताही वैयक्तिक किंवा व्यावसायिक स्वार्थ नाही. तरी देखील आम्हाला सभासदाला भेटण्याची परवानगी देण्यात आली नाही व विनाकारण वादाचे वातावरण निर्माण करण्यात आले.

परिस्थिती अधिक चिघळू नये म्हणून आम्हाला नाईलाजाने ११२ क्रमांकावर फोन करावा लागला. त्यानंतर पोलीस/मार्शल बीट घटनास्थळी आले व त्यांनी मध्यस्थी केली. दोन्ही पक्षांना पोलीस स्टेशनमध्ये येण्यास सांगण्यात आले. आम्ही जबाबदार नागरिक व संघटनेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित राहिलो. मात्र, भारती हॉस्पिटल प्रशासनाकडून कोणताही जबाबदार प्रशासन अधिकारी पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित झाला नाही. त्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी आमच्याकडून संपूर्ण माहिती घेतली असून, शनिवारी दोन्ही बाजूंना बोलावून समोरासमोर चर्चा करण्यास येईल, असे सांगण्यात आले आहे.

आमचा मुख्य मुद्दा असा आहे की– संघटनेचे प्रतिनिधी भारती हॉस्पिटलमध्ये जाण्याचा उद्देश केवळ संघटनेच्या सभासदांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे उपचार, ESIC सुविधा व कामगारांच्या हक्कांचे संरक्षण हा आहे.

ESIC अंतर्गत पात्र कामगारांना नियमानुसार उपचार सुविधा उपलब्ध करून घेणे आवश्यक असताना, प्रत्यक्षात अनेक वेळा Approval, Claim ID, Online Intimation आवश्यक कागदपत्रे, उपचाराची परवानगी, डिपॉझिट किंवा इतर कारणांमुळे कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना अडचणी निर्माण होतात. ESIC शी संबंधित प्रक्रियेत हॉस्पिटलने आवश्यक ती ऑनलाइन प्रक्रिया, Claim ID/Approval संदर्भातील कार्यवाही व (पान ४ वर)

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आमदार श्री.हेमंत रासणे, महानगरपालिका आयुक्त श्री.नवल किशोर राम व पोलीस आयुक्त श्री.अमितेश कुमार यांच्याकडून संयुक्त पाहणी

### प्रमुख मिरवणूक मार्ग व परिसरातील रस्ते, वाहतूक आणि पायाभूत सुविधांचा घेतला आढावा

**पुणे** : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिक व भाविकांना सुरक्षित आणि सुरळीत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कसबा व विश्रामबाग वॉर्ड कार्यालयाच्या हद्दीतील प्रमुख मिरवणूक मार्ग व परिसराची संयुक्त पाहणी करण्यात आली. आमदार श्री.हेमंत रासणे, पुणे महानगरपालिका आयुक्त श्री.नवल किशोर राम आणि पुणे पोलीस आयुक्त श्री.अमितेश कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही पाहणी करण्यात आली.

यावेळी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने रस्त्यांची स्थिती, खड्डे, पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था, विद्युत व्यवस्था, पादचारी मार्ग, अतिक्रमण तसेच वाहतूक व्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. पाहणीदरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींवर तातडीने उपाययोजना करून गणेशोत्सवापूर्वी सर्व आवश्यक कामे पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागांना



देण्यात आल्या.

कसबा गणपती मंदिर येथून पाहणीस सुरुवात करून शिवाजी रोडमार्गे भाऊ रंगारी गणपती, तांबडी जोगेश्वरी, केळकर रोड, पासोड्या विठोबा मंदिर, सोन्या मारुती मंदिर, सोमेश्वर मंदिर, रांका ज्वेलर्स, महाराणा प्रताप रस्ता मार्गे कस्तुरी चौक, जैन मंदिर नाईक हॉस्पिटल मार्गे फडगे पोलिस चौकी, सेवा मित्र मंडळ, मंडई गणपती, दगडूशेठ देखावा, गुरूजी तालीम, लक्ष्मी रस्ता, पुरम चौक तसेच इतर महत्त्वाच्या परिसरांची पाहणी करण्यात आली.

काँक्रीट व डांबरी रस्त्यांवरील खड्डे, पाणीपुरवठा, ड्रेनेज व महावितरणच्या केबल खोदाईनंतर अपूर्ण राहिलेली रस्ते दुरुस्ती, तसेच पदपथ व अरुंद रस्त्यांवर पादचाऱ्यांना अडथळा ठरणारे विद्युत डीपी बॉक्स याचीही पाहणी करण्यात आली तसेच काही ठिकाणी ड्रेनेज लाईनमधील गळती, तुंबलेल्या वाहिन्या आणि खोदाईनंतर (पान ४ वर)

## गणेशोत्सवात २२ रूग्णवाहिका, २५ बाइक रायडर्स १०८ वर मोफत देणार वैद्यकीय सेवा

**पुणे** : गणेशोत्सवाच्या काळात पुण्यात दाखल होणाऱ्या लाखो भाविकांना गर्दीच्या ठिकाणी मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी श्री तुळशीबाग सार्वजनिक गणपती मंडळ ट्रस्ट, हुतात्मा बाबू गेनू मंडळ ट्रस्ट, श्री गजलक्ष्मी ट्रस्ट आणि आम्ही पुणेकर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रायडर्स ऑफ दक्खन यांच्या सहकार्याने यंदा २२ मोफत रुग्णवाहिका आणि २५ बाइक रायडर्स वैद्यकीय सेवेसाठी सज्ज करण्यात आले आहेत.

आरोग्यसेवा आपल्या दारी या अभियानाचा शुभारंभ शनिवारी (दि.१२) पत्रकार भवन येथे करण्यात आला. यावेळी तुळशीबाग सार्वजनिक गणपती मंडळ ट्रस्टचे कोषाध्यक्ष नितीन पंडित, आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव, गजलक्ष्मी ढोल-ताशा पथकाचे प्रमुख केतन देशपांडे, नगरसेविका स्वप्नाली पंडित, सुमित ग्रुपचे यश साळुंखे, झोनल मॅनेजर डॉ.विजय ताते, नानासाहेब ओव्हाळ, डॉ.विजय पाटील



एआय इमेज

आदी उपस्थित होते.

दरम्यान, अर्चना मारणे-रासकर यांनी ऑटोमॅटिक ॲम्ब्युलन्सची माहिती यावेळी दिली. गणेशोत्सवाच्या काळात तुळशीबाग, हुतात्मा बाबू गेनू मंडळ परिसरासह शहरातील विविध गर्दीच्या ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतात. अशा ठिकाणी अचानक वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास गरजूंनी १०८ नंबरवर संपर्क साधल्यास मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येईल. ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. फरासखाना (पान ४ वर)

# संपादकीय...

## क्रीडा कोट्यातून सरकारी नोकरी मिळविणे गुन्हा नाही पण बनावट प्रमाणपत्र वापरणे गंभीर अपराध

प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि इतर क्षेत्रांत नोकरीसाठी असलेल्या ५ टक्के आरक्षणात सुसूत्रता आणण्यासाठी सुधारित धोरणास राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मान्यता दिली. या सुधारित धोरणानुसार आरक्षणासाठी पात्र खेळाडूंना तीन महिन्यांच्या मुदतीत क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.

क्रीडा क्षेत्रात जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटविणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि इतर क्षेत्रात नोकरीसाठी सुधारित धोरण लागू करण्यात येत आहे. क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना क्रीडा कोट्याअंतर्गत सरकारी नोकरीमध्ये संधी देण्याची व्यवस्था आहे. या व्यवस्थेमागे केवळ रोजगार देण्याचा हेतू नसून खेळाडूंना प्रोत्साहन देणे त्यांच्या प्रतिभेचा सन्मान करणे आणि समाजात क्रीडा संस्कृती रूजवणे हा व्यापक उद्देश आहे. क्रीडा कोट्यातून सरकारी नोकरी मिळविणे गुन्हा नाही पण बनावट प्रमाणपत्र वापरणे आणि त्याचा उपयोग करून शासकीय नोकरी मिळविणे हे फार गंभीर व मोठा अपराध आहे. आणि त्यांच्यावरती कारवाई झालीच पाहिजे कारण स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका तरूणाने, कधीही खेळ न खेळलेल्या त्याच्याच मित्राला क्रीडा कोट्यातून सरकारी नोकरी मिळाल्याचे पाहिले. त्याला संशय आला. त्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हे रॅकेट उघडकीस आले. २०१६ ते २०१९ दरम्यान ज्या राज्यस्तरीय स्पर्धा दाखवल्या, त्या प्रत्यक्षात कधी झाल्याच नव्हत्या २०१६-१७ ची प्रमाणपत्रे धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या नावाने जारी केली गेली; तर ही नावे २०२३ मध्ये बदलण्यात आली.

क्रीडा विभागातील काही अधिकाऱ्यांच्या सहभागाशिवाय ही प्रमाणपत्रे मंजूर होणे कठीण असल्याचे सांगत, वरिष्ठ पोलिसांनी या प्रकरणी सरकारी अधिकाऱ्यांचीही चौकशी सुरू असल्याचे संकेत दिले आहेत. एका प्रमाणपत्रासाठी ३० लाख ते ५ लाख रूपये उकळले जात असल्याचे समोर आले.

आतापर्यंत ६० उमेदवारांची ओळख पटली असून पुणे शहर पोलिस दलाच्या भरती प्रक्रियेत अशा प्रमाणपत्रांच्या आधारे १९ उमेदवारांनी खेळाडू आरक्षणाचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. त्यापैकी दहा जण प्रशिक्षणासाठी गेले आहेत, तर नऊ जणाचे प्रशिक्षण अद्याप सुरू झालेले नाही. सरकारी नोकरीत मिळणाऱ्या ५ टक्के क्रीडा कोट्याचा लाभ घेण्यासाठी बोगस क्रीडा प्रमाणपत्रे बनवून देणाऱ्या मोठ्या रॅकेटचा पुणे पोलिसांनी पर्दाफाश केला. १० वर्षांत कुराश खेळाची १५०० हून अधिक बनावट प्रमाणपत्रे वाटली गेल्याचा संशय आहे.

याप्रकरणी पुणे पोलिसांनी कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्या दोन पदाधिकाऱ्यांना अटक केली आहे. शिवाजी जयवंत साळुंखे (४६, रा.फुरसुंगी-हडपसर, मूळ रा.कोल्हापूर) आणि अंकुश विठ्ठल नगर (४०, रा.चंदीगड, मूळ रा.अहिल्यानगर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तपासात कुराशच्या काही स्पर्धा प्रत्यक्ष झाल्याचे आढळले आहे. मात्र, काही स्पर्धा केवळ कागदोपत्री दाखविण्यात आल्याचा पोलिसांना संशय आहे. त्यामुळे संघटनेने दिलेल्या प्रत्येक प्रमाणपत्राची स्वतंत्रपणे तपासणी केली जाणार आहे. स्पर्धा कुठे आणि कधी झाली, त्यात कोण सहभागी झाले, निकाल काय होता आणि प्रमाणपत्र देताना कोणती प्रक्रिया पाळण्यात आली, याची माहिती पोलिसांकडून संकलित केली जात आहे. संबंधित राज्य संघटना राष्ट्रीय स्तरावरील संघटनेशी संलग्न असणे अपेक्षित होते. मात्र, ती संलग्न नसल्याची माहिती तपासात समोर आली आहे. असे असतानाही या संघटनेने प्रमाणपत्रे कशी दिली आणि शासकीय भरती प्रक्रियेत त्यांना मान्यता कशी मिळाली, याचा शोध पोलिस घेत आहेत.

बनावट प्रमाणपत्राच्या वापर केवळ पोलिस भरतीपुरता मर्यादित नसून, राज्य सरकारच्या विविध विभागांतील वर्ग एक, वर्ग दोन तसेच अन्य पदांच्या भरतीतही झाला असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. संघटनेने वितरित केलेल्या एक हजारांहून अधिक प्रमाणपत्रांपैकी किती प्रमाणपत्रांचा वापर सरकारी नोकरी मिळविण्यासाठी झाला, किती उमेदवारांनी खेळाडू आरक्षणाचा लाभ घेतला आणि त्यापैकी किती जण सध्या शासकीय सेवेत आहेत, याचा तपास सुरू आहे. हे रॅकेट नेमके कशा पध्दतीने चालविले जात होते. त्यात आणखी कोणाचा सहभाग आहे, स्पर्धा कागदोपत्री दाखविण्यासाठी कोणती कागदपत्रे तयार करण्यात आली आणि प्रमाणपत्राना शासकीय मान्यता मिळवून देण्यासाठी कोणत्या स्तरावर प्रयत्न झाले, याचाही शोध पोलिस घेत आहेत.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक - यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग - सी - २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे - ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaawaz22@gmail.com
Email : sangharshachaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



**मागील अंकावरून**

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट-भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमशः**

# सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरुवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

**उत्तमराव सोनवणे**

# जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली चाकण एमआयडीसी परिसरातील पायाभूत सुविधा समितीची बैठक संपन्न

## राष्ट्रीय महामार्गावरील फोडलेले दुभाजक बंद; वाहतूक सुरळीत करण्यासाठी उपाययोजना

**पुणे** : चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाढती वाहतूक कोंडी कमी करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी रस्ते व अन्य पायाभूत सुविधांची कामे गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. रस्त्यांच्या विकासकामांपैकी बहुतांश कामे सुरू झाली असून, पूर्ण झालेल्या तसेच प्रगतिपथावर असलेल्या कामांमुळे चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक व्यवस्थेत आगामी काळात मोठा बदल अपेक्षित आहे.



याबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच चाकण एमआयडीसी पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. बैठकीत रस्ते विकासासह वाहतूक व्यवस्थापन, वाहनतळ, पाणी निचरा, वीजपुरवठा, रस्तादुभाजक व परिसर सुशोभीकरण आदी कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार बाबाजी काळे, आमदार शंकर मांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्यासह एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पीएमआरडीए, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, महावितरण, जीवन प्राधिकरण यांचे अधिकारी, उद्योग संघटनांचे प्रतिनिधी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### रस्त्यांचा एकत्रित आढावा

चाकण औद्योगिक क्षेत्रातील एमआयडीसीच्या अखत्यारितील २५ किलोमीटर, राष्ट्रीय महामार्गाचे १२.८ किलोमीटर, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे २२ किलोमीटर आणि पीएमआरडीएच्या अखत्यारितील १७.५ किलोमीटर रस्त्यांचा समावेश आहे. विविध प्राधिकरणांच्या अखत्यारितील या रस्त्यांच्या कामांमध्ये आवश्यक समन्वय साधून ती गतीने पूर्ण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

### महत्त्वाच्या रस्त्यांची कामे वेगाने सुरु

चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक २ मधील ७५ मीटर रुंदीच्या मुख्य रस्त्याच्या ५.५० किलोमीटर लांबीच्या सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

टप्पा क्रमांक ४ मधील सह्याद्री रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण, दोन्ही बाजूंच्या पदपथांची दुरुस्ती, मध्यभागी सिमेंट कॉंक्रीटचे रस्तादुभाजक बसविणे आणि सुशोभीकरणाचे ४.०३ किलोमीटर लांबीचे काम सुरू असून आतापर्यंत ८० टक्के काम पूर्ण झाले आहे.

यासोबतच टप्पा क्रमांक १ व २ मधील मुख्य रस्त्यांचे १४.६५ किलोमीटर लांबीचे सिमेंट कॉंक्रीटीकरण, टप्पा क्रमांक ३ मधील आळंदी फाटा (स्पायसर चौक) ते व्होक्सवॅगन-स्कोडा कंपनीपर्यंतच्या ५.७० किलोमीटर रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण आणि टप्पा क्रमांक ५ मधील ४.४० किलोमीटर लांबीच्या चौपदरी मुख्य रस्त्याचे काम प्रगतिपथावर आहे.

### वाहतूक कोंडीवर मनुष्यबळासह यंत्रणांची मदत

चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी ४५ एमएसएफ जवानांची नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्यालयाकडून मान्यता मिळाली असून याबाबत पोलीस विभागास कळविण्यात आले आहे.

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांना एमआयडीसीमार्फत एक क्रेन आणि ५० जॅमर उपलब्ध करून देण्यासही मान्यता मिळाली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

राष्ट्रीय महामार्गावर जागोजागी फोडण्यात आलेले दुभाजक बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली असून वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरु आहेत.

### वाहनतळ सुरू; पाणी निचऱ्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था

औद्योगिक क्षेत्रातील वाहनतळ सुरु झाले असून वाहनांची पार्किंग नियोजित ठिकाणी करण्यात येत आहे. रस्त्यांच्या साईड पट्ट्यांचे कामही युद्धपातळीवर सुरु आहे. ज्या ठिकाणी पाणी साचते, त्या ठिकाणी भविष्यात पाणी साचणार नाही, यासाठी सल्लागार कंपनीच्या माध्यमातून कायमस्वरूपी पाणी निचरा व्यवस्था निर्माण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता पावसाळ्यातही प्रभावी ठरेल, अशी व्यवस्था निर्माण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### वीजपुरवठा क्षमता वाढविण्यावर भर

महावितरणचा आवश्यक ट्रान्सफॉर्मर संबंधित ठिकाणी उपलब्ध झाला असून त्यासाठीचे बांधकाम सुरु आहे. आतापर्यंत सुमारे २५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम लवकर पूर्ण करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे एमआयडीसीला अपेक्षित असलेल्या वीजपुरवठ्यापेक्षा अधिक वीज उपलब्ध होणार असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले.

### रस्तादुभाजक व परिसर सुशोभीकरणाचे नियोजन

रस्तादुभाजकांच्या देखभालीसाठी नियमित निरीक्षण व देखरेख आराखडा तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डुडी यांनी दिल्या. तसेच औद्योगिक क्षेत्राचा सर्वांगीण विकास लक्षात घेऊन शहरी भू-दृश्यीकरणाच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि आमदार बाबाजी काळे यांनी औद्योगिक क्षेत्रातील विविध समस्या व सूचना मांडल्या. त्यावर संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले.

# भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता

दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन' म्हणून साजरा केला जातो. लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि जनसहभाग यांवर आधारलेली जीवनपद्धती आहे. लोकशाहीमध्ये जनता ही सत्तेचा अंतिम स्रोत मानली जाते. नागरिकांना आपल्या प्रतिनिधींची निवड करण्याचा अधिकार असतो आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जनतेपुढे उत्तरदायी राहणे अपेक्षित असते. भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही प्रजासत्ताकाचा स्वीकार करून विविधतेने नटलेल्या विशाल देशात लोकशाही व्यवस्था यशस्वीपणे रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, स्वतंत्र निवडणूक व्यवस्था, संविधानिक संस्था आणि कायद्याचे राज्य या आधारांवर भारतीय लोकशाहीची वाटचाल झाली. मात्र, लोकशाहीच्या या प्रवासात एक गंभीर आव्हान सातत्याने जाणवते ते म्हणजे नागरिकांची वाढती उदासीनता होय. मतदानापुरते नागरिकत्व मर्यादित राहणे, सार्वजनिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे, शासनाच्या कामकाजाची माहिती न घेणे, चुकीच्या माहितीवर सहज विश्वास ठेवणे आणि आपल्या अधिकारांइतकीच कर्तव्येही महत्त्वाची आहेत याची जाणीव कमी होणे, या प्रवृत्ती लोकशाहीसाठी चिंताजनक आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी सक्षम संस्था जितक्या आवश्यक आहेत, तितकाच जागरूक, विवेकी आणि सक्रिय नागरिकही आवश्यक आहे.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिले आहेत. धर्म, जात, भाषा, लिंग, आर्थिक स्थिती किंवा सामाजिक पार्श्वभूमी यांचा विचार न करता प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला. हा अधिकार केवळ शासन निवडण्याचे साधन नाही, तर नागरिकाच्या राजकीय अस्तित्वाची मान्यता आहे. सामान्य माणसाचे मत आणि सत्तेच्या सर्वोच्च स्तरावरील व्यक्तीचे मत मतदानाच्या प्रक्रियेत समान मूल्याचे असते. हीच राजकीय समानता लोकशाहीचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. परंतु मतदानाचा अधिकार असूनही जर नागरिकाने निवडणुकीच्या दिवशी मतदान करण्यापलीकडे सार्वजनिक जीवनाशी संबंध ठेवला नाही, तर लोकशाहीतील त्याचा सहभाग अपुरा ठरतो. लोकशाहीमध्ये नागरिक हा केवळ मतदार नसतो; तो शासनाचा निरीक्षक, प्रश्न विचारणारा, सहभागी आणि उत्तरदायित्वाची मागणी करणारा घटक असतो. त्यामुळे नागरिकांची उदासीनता ही केवळ वैयक्तिक बाब नसून लोकशाहीच्या गुणवत्तेशी संबंधित प्रश्न आहे.

नागरिकांच्या उदासीनतेचे सर्वांत स्पष्ट उदाहरण म्हणजे सार्वजनिक प्रश्नांपासून दूर राहण्याची प्रवृत्ती होय. आपल्या परिसरातील रस्ते खराब असतील, पाणीपुरवठा अनियमित असेल, सार्वजनिक आरोग्यसेवा अपुरी असेल, शाळांमध्ये सुविधा कमी असतील किंवा सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न निर्माण होत असतील, तरी अनेक नागरिक त्याकडे 'हे सरकारचे काम आहे' या भावनेने पाहतात. शासनाचे काम जनतेसाठी असले तरी शासनाला योग्य प्रश्न विचारणे आणि प्रशासनाकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील प्रश्न समजून घेऊन ग्रामसभा, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक सुनावण्या आणि उपलब्ध घटनात्मक व कायदेशीर मार्गांचा वापर केला तर लोकशाही तळागाळापर्यंत अधिक प्रभावी होऊ शकते. मात्र, 'आपण काही केले तरी काय बदलणार?' अशी मानसिकता लोकशाहीतील सक्रिय सहभागाला अडथळा निर्माण करते.

मतदानाबाबतची उदासीनता हा देखील गंभीर विषय आहे. मतदान हा प्रत्येक पात्र नागरिकाचा महत्त्वपूर्ण अधिकार आहे; परंतु काही नागरिक मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राकडे जाण्याऐवजी आपल्या दैनंदिन कामाला किंवा वैयक्तिक सोयीला अधिक महत्त्व देतात. काही जण राजकारणाबद्दल नाराजी व्यक्त करतात, परंतु त्या नाराजीचे रूप मतदानातून किंवा घटनात्मक सहभागातून व्यक्त करीत नाहीत. 'सर्वच उमेदवार सारखे आहेत', 'माझ्या एका मताने काय फरक पडणार?' किंवा 'राजकारणात काहीच बदलत नाही' अशा भावना लोकशाहीतील निष्क्रियता वाढवतात. प्रत्यक्षात प्रत्येक मत हे लोकशाहीच्या निर्णयप्रक्रियेतील एक महत्त्वाचे साधन आहे. उमेदवारांची माहिती घेणे, त्यांच्या सार्वजनिक भूमिकेचा अभ्यास करणे आणि विवेकपूर्वक मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. मतदान न करण्याची उदासीनता ही अप्रत्यक्षपणे इतरांच्या निर्णयाला अधिक प्रभावी बनवू शकते.

नागरिकांच्या उदासीनतेमागे राजकीय प्रक्रियेबद्दल निर्माण झालेला अविश्वास हे एक कारण असू शकते. राजकारणातील भ्रष्टाचार, आश्वासनांची पूर्तता न होणे, वाढता निवडणूक खर्च, राजकीय संघर्षातील कटुता किंवा सार्वजनिक संस्थांवरील अविश्वास यामुळे काही नागरिक राजकीय प्रक्रियेपासून दूर जातात. मात्र, लोकशाहीतील त्रुटींवर नाराजी व्यक्त करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे लोकशाही प्रक्रियेपासून दूर जाणे नव्हे, तर त्या प्रक्रियेत अधिक सक्रियपणे सहभागी होणे हा आहे. चांगले उमेदवार निवडणे, धोरणांवर चर्चा करणे, प्रश्न विचारणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे आणि आवश्यकतेनुसार शांततामय व संविधानिक मार्गाने जनमत तयार करणे यामुळे लोकशाहीतील सकारात्मक बदल शक्य होतात. उदासीनता बदल घडवून आणत नाही; जागरूक सहभागच बदलाचे माध्यम बनतो.

लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. अनेक नागरिकांना संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार, शासनाच्या विविध योजनांची माहिती किंवा नागरिकांना उपलब्ध असलेल्या कायदेशीर मार्गांची पुरेशी माहिती नसते. माहितीचा अभाव हा लोकशाहीतील सहभाग कमी करणारा महत्त्वाचा घटक आहे. नागरिकांना आपले अधिकार आणि कर्तव्ये समजली तर ते शासनव्यवस्थेत अधिक प्रभावीपणे सहभागी होऊ शकतात. म्हणून लोकशाही साक्षरता ही सामान्य साक्षरतेइतकीच महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि प्रसारमाध्यमांनी नागरिकांना संविधान, लोकशाही प्रक्रिया आणि सार्वजनिक संस्थांविषयी माहिती देण्याचे कार्य अधिक प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.



डॉ.राजेंद्र बगाटे, (लेखक, मराठी व समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ईमेल - bagate.rajendra5gmail.com
'mo:- ०९९६०१०३५८२

आजच्या डिजिटल युगात नागरिकांच्या उदासीनतेचे स्वरूप काहीसे बदलले आहे. सामाजिक माध्यमांवर राजकीय विषयांवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. अनेक नागरिक आपले मत व्यक्त करतात, सरकारच्या धोरणांवर प्रतिक्रिया देतात आणि विविध सार्वजनिक प्रश्नांवर भूमिका घेतात. मात्र, सामाजिक माध्यमांवरील सक्रियता आणि प्रत्यक्ष लोकशाही सहभाग यांमध्ये फरक आहे. एखाद्या विषयावर प्रतिक्रिया देणे, संदेश पुढे पाठविणे किंवा एखाद्या छायाचित्रावर मत व्यक्त करणे एवढ्याने लोकशाही सहभाग पूर्ण होत नाही. प्रत्यक्ष जीवनातील सार्वजनिक प्रश्नांमध्ये सहभागी होणे, सत्य माहिती मिळविणे, प्रशासनाकडे प्रश्न मांडणे आणि सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी योगदान देणे आवश्यक आहे. आभासी जगातील सक्रियता वास्तविक लोकशाही सहभागाची जागा घेऊ शकत नाही.

खोटी माहिती आणि अफवांचा प्रसार ही नागरिकांच्या उदासीनतेशी जोडलेली आणखी एक गंभीर समस्या आहे. माहितीचा स्रोत तपासण्याची सवय नसल्यास नागरिक सहजपणे चुकीच्या प्रचाराला बळी पडू शकतात. विशेषतः निवडणुकीच्या काळात अर्धसत्य, दिशाभूल करणारे संदेश आणि बनावट माहिती लोकमतावर परिणाम करू शकतात. एखादी माहिती आपल्या मताशी जुळते म्हणून ती खरी आहे असे मानणे ही लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती आहे. विवेकी नागरिकाने प्रत्येक माहितीचा स्रोत तपासला पाहिजे, अधिकृत माहितीशी तिची पडताळणी केली पाहिजे आणि संशयास्पद माहिती पुढे पाठविणे टाळले पाहिजे. डिजिटल साक्षरता ही आज जबाबदार नागरिकत्वाची अत्यावश्यक अट बनली आहे.

नागरिकांची उदासीनता आणि सामाजिक असमानता यांचाही जवळचा संबंध आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण, वंचित किंवा उपेक्षित नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जगण्याच्या प्रश्नांमध्ये इतके गुंतून राहावे लागते की व्यापक सार्वजनिक प्रश्नांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांच्याकडे वेळ, साधने किंवा माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे लोकशाहीचा सहभाग केवळ औपचारिक अधिकार देऊन पूर्ण होत नाही. शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा आणि मूलभूत सुविधा यांचा विस्तार झाला तर नागरिकांचा सार्वजनिक जीवनातील सहभागही वाढतो. सामाजिक न्याय आणि लोकशाही सहभाग यांचे नाते त्यामुळे अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजातील वंचित घटकांचा आवाज निर्णयप्रक्रियेत पोहोचविणे ही लोकशाहीची जबाबदारी आहे.

महिलांच्या लोकशाही सहभागाकडेही या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. महिलांना मतदानाचा अधिकार मिळाल्यानंतरही त्यांच्या राजकीय सहभागाचा विस्तार होण्यासाठी अनेक सामाजिक अडथळे पार करावे लागले. घरगुती जबाबदाऱ्या, सामाजिक रूढी, आर्थिक अवलंबित्व, राजकीय क्षेत्रातील असुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत मर्यादित प्रतिनिधित्व यांमुळे अनेक महिलांचा सार्वजनिक सहभाग अपेक्षेइतका प्रभावी होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्यामुळे तळागाळातील लोकशाहीला नवी दिशा मिळाली आहे. मात्र, प्रतिनिधित्वासोबत निर्णयक्षमता आणि स्वायत्तता वाढणेही आवश्यक आहे. महिलांचा आवाज सार्वजनिक धोरणांमध्ये प्रभावीपणे प्रतिबिंबित झाला तर लोकशाही अधिक समताधिष्ठित बनेल.

युवकांची उदासीनता हीदेखील चिंतेची बाब आहे. युवक हा देशाचा मोठा सामाजिक घटक असून लोकशाहीच्या भवितव्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक युवक सामाजिक माध्यमांवर सक्रिय असले तरी प्रत्यक्ष सामाजिक आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. राजकीय प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्याऐवजी क्षणिक लोकप्रियतेवर आधारित मत तयार होणे ही धोकादायक बाब आहे. युवकांनी संविधानाचा अभ्यास करणे, विविध राजकीय विचार समजून घेणे, सार्वजनिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि सामाजिक कार्यात सहभागी होणे आवश्यक आहे. चर्चासत्रे, संविधान दिनाचे उपक्रम, सामाजिक सेवा आणि स्थानिक प्रश्नांवरील प्रकल्प यांमधून युवकांमध्ये लोकशाहीची जाणीव विकसित करता येऊ शकते.

लोकशाहीमध्ये विरोधी मताचा सन्मान करणे हा सक्रिय नागरिकत्वाचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र, नागरिकांच्या उदासीनतेसोबतच अंधसमर्थनाची प्रवृत्तीही लोकशाहीसाठी धोकादायक आहे. एखादा राजकीय पक्ष किंवा नेता आपल्या आवडीचा आहे म्हणून त्याच्या प्रत्येक निर्णयाला समर्थन करणे ही लोकशाही वृत्ती नाही. त्याचप्रमाणे विरोधी पक्ष किंवा वेगळ्या विचारसरणीतील प्रत्येक भूमिकेला चुकीचे ठरविणेही विवेकपूर्ण नागरिकत्वाचे लक्षण नाही. नागरिकांनी व्यक्तीपेक्षा धोरणे, विचार आणि सार्वजनिक कामगिरी यांचे मूल्यमापन केले पाहिजे. लोकशाहीमध्ये प्रश्न विचारणे हा विरोधाचा नव्हे तर जबाबदार नागरिकत्वाचा भाग आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून नागरिकांच्या उदासीनतेवर प्रभावीपणे मात करता येऊ शकते. ग्रामसभा, नगरपालिका सभा आणि स्थानिक विकास प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. गावातील पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, रोजगार आणि पर्यावरणाशी संबंधित प्रश्न नागरिकांनी सामूहिकपणे मांडले तर प्रशासनावर सकारात्मक दबाव निर्माण होतो. सार्वजनिक निधीचा वापर, विकासकामांची गुणवत्ता आणि योजनांचा लाभ याबाबत माहिती घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. स्थानिक पातळीवर सक्रिय नागरिकत्वाची सवय लागली तर राष्ट्रीय पातळीवरील लोकशाही सहभागही अधिक अर्थपूर्ण होतो.

लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता दूर करण्यासाठी शिक्षण आणि मूल्यसंस्कार यांना विशेष महत्त्व आहे. लोकशाहीचे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकातील धड्यापुरते मर्यादित राहता कामा नये. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत सहभागी करून घेणे, त्यांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणे, मतभिन्नतेचा आदर शिकविणे आणि संविधानिक मूल्यांचा व्यवहारात उपयोग करून दाखविणे आवश्यक आहे. घर, शाळा, महाविद्यालय आणि समाज या सर्व स्तरांवर संवादाची संस्कृती विकसित झाली तर लोकशाही वृत्ती अधिक मजबूत होईल. स्वतःचे मत मांडताना दुसऱ्याचे मत ऐकण्याची तयारी ही लोकशाहीची मूलभूत शिस्त आहे.

नागरिकांच्या उदासीनतेवर मात करण्यासाठी शासन आणि सार्वजनिक संस्थांचीही जबाबदारी आहे. शासनाची माहिती सहज उपलब्ध असणे, सार्वजनिक सेवांमध्ये पारदर्शकता असणे, नागरिकांच्या तक्रारींवर वेळेवर कार्यवाही होणे आणि प्रशासन नागरिकांशी संवाद साधणारे असणे आवश्यक आहे. नागरिकांना वारंवार अनुभव येत असेल की त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होते, तर शासनावरील विश्वास कमी होऊ शकतो. त्यामुळे पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासन नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांनी शासनाला प्रश्न विचारणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच शासनाने त्या प्रश्नांना उत्तर देणेही महत्त्वाचे आहे.

भारतीय लोकशाहीची शक्ती तिच्या व्यापक लोकसहभागात आहे. भारतातील निवडणुकांमध्ये कोट्यवधी नागरिक सहभागी होतात, विविध सामाजिक घटक राजकीय प्रक्रियेत प्रतिनिधित्व मिळवितात आणि शांततामय मार्गाने सत्तांतर घडते, ही मोठी उपलब्धी आहे. परंतु लोकशाहीची गुणवत्ता केवळ निवडणुकांच्या यशाने मोजता येत नाही. नागरिक वर्षभर सार्वजनिक प्रश्नांमध्ये किती सहभागी होतात, शासनाच्या कामकाजाबाबत किती जागरूक असतात, संविधानिक मूल्यांचा किती आदर करतात आणि सामाजिक न्यायासाठी किती संवेदनशील असतात, यावरही लोकशाहीचे यश अवलंबून असते.

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाच्या निमित्ताने त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे की आपण केवळ मतदार आहोत की सक्रिय नागरिक? आपल्या परिसरातील सार्वजनिक प्रश्नांची आपल्याला माहिती आहे का? आपण लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारतो का? शासनाच्या योजनांची माहिती घेतो का? चुकीची माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासतो का? मतभिन्न असलेल्या व्यक्तीच्या मताचा सन्मान करतो का? संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे भारतीय लोकशाहीच्या वर्तमानाचे चित्र स्पष्ट करू शकतात.

लोकशाही ही केवळ संसदेत किंवा विधानसभेत अस्तित्वात नसते. ती नागरिकांच्या विचारांत, वर्तनात आणि दैनंदिन कृतीत जिवंत राहते. घरात प्रत्येकाचे मत ऐकले जाते तेव्हा, शाळेत प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन दिले जाते तेव्हा, समाजात भिन्न मतांचा आदर केला जातो तेव्हा आणि सार्वजनिक संस्थांना जबाबदार धरले जाते तेव्हा लोकशाही मजबूत होते. नागरिकांची उदासीनता वाढली तर लोकशाहीच्या संस्था असूनही तिचा आत्मा दुर्बल होऊ शकतो. उलट, जागरूक आणि सक्रिय नागरिक असतील तर कोणतीही लोकशाही अधिक सक्षम बनू शकते.

१५ सप्टेंबरचा आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा म्हणूनच केवळ लोकशाहीचा गौरव करण्याचा दिवस नसून तिच्या आरोग्याचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने आहेत; परंतु त्यावर मात करण्याची क्षमता भारतीय समाजातही आहे. नागरिकांनी मतदानाचा अधिकार जबाबदारीने वापरला, सार्वजनिक प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग घेतला, संविधानिक मूल्यांचे पालन केले, खोटी माहिती आणि द्वेषपूर्ण प्रचाराला नकार दिला, वंचितांच्या अधिकारांविषयी संवेदनशीलता दाखविली आणि शासनाला सातत्याने उत्तरदायी ठेवले तर लोकशाही अधिक मजबूत होईल. 'माझ्यामुळे काय फरक पडणार?' या उदासीन मानसिकतेऐवजी 'लोकशाही मजबूत करण्यासाठी माझी भूमिका काय?' हा प्रश्न प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. कारण लोकशाहीचे भविष्य केवळ सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर अवलंबून नसते; ते नागरिकांच्या जागरूकतेवर, सहभागावर आणि संविधाननिष्ठ वृत्तीवरही अवलंबून असते. नागरिक जागा झाला तर लोकशाही जागी राहते; नागरिक उदासीन झाला तर लोकशाहीची मुळे कमकुवत होऊ लागतात. म्हणूनच भारतीय लोकशाही अधिक सक्षम, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने केवळ मतदान करणारा मतदार न राहता जागरूक, विवेकी, प्रश्न विचारणारा आणि जबाबदार लोकशाही नागरिक बनणे, हीच आजच्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाची खरी गरज आणि काळाची हाक आहे.

# अपर मुख्य सचिव (सेवा) तथा उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सच्या अध्यक्ष व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक व अन्य भागधारकांशी टास्क फोर्ससोबत सल्लामसलत

**पुणे** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित, स्थिर आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सच्या वतीने पुण्यात विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि अन्य भागधारकांशी सल्लामसलत करण्यात आली. परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिकेची गुणवत्ता, प्रश्नपत्रिका गळतीला प्रतिबंध, पदसंख्या, उत्तरतालिका, परीक्षा केंद्रे, तक्रार निवारण आणि 'ऑप्टिंग आऊट' याबाबत विविध सूचना मांडण्यात आल्या.

सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) तथा टास्क फोर्सच्या अध्यक्ष व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत आहे. समितीत पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त) आणि आयआयटी मुंबईचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे यांचा समावेश आहे.



टास्क फोर्सकडे आतापर्यंत राज्यभरातून १८ हजारांहून अधिक ई-मेल्स प्राप्त झाले आहेत. परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक निश्चित करून त्याचे पालन करावे तसेच कार्यपद्धतीत वारंवार बदल न करता दीर्घकालीन स्थैर्य द्यावे, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. विविध संवर्गांसाठी किमान पदसंख्या आधीच जाहीर करण्याची सूचनाही करण्यात आली.

प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून छपाई, वाहतूक आणि वितरणापर्यंतची प्रक्रिया अधिक सुरक्षित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा समितीचा मानस आहे. प्रश्न तयार करणाऱ्या व्यक्तीलाही तो कोणत्या परीक्षेसाठी आहे, याची माहिती नसावी, अशा पद्धतीच्या ई-प्रश्नसंचाचा विचार करण्यात येत आहे. 'झिरो लीक' हे परीक्षाप्रक्रियेतील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे समितीने स्पष्ट केले.

प्रश्नपत्रिकेतील त्रुटी आणि उत्तरतालिकेतील चुका टाळण्यासाठी गुणवत्ता नियंत्रणाची प्रक्रिया अधिक काटेकोर करण्याची, तसेच उत्तरपत्रिका तपासणीसाठी समान निकष व परीक्षकांच्या गुणवत्तेची पडताळणी करण्याची सूचना विद्यार्थ्यांनी केली. उमेदवारांच्या तक्रारी व हरकतींसाठी केंद्रीकृत ऑनलाइन पोर्टल असावे, अशी मागणी करण्यात आली. परीक्षा केंद्रांवर स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि योग्य बैठक व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. सर्व परीक्षांसाठी एकदाच नोंदणी व शुल्क भरण्याची व्यवस्था करण्याची सूचनाही मांडण्यात आली.

एकाच उमेदवाराला अनेक पदांसाठी पात्रता मिळाल्यास पदनिवड आणि 'ऑप्टिंग आऊट' प्रक्रियेबाबत स्पष्ट धोरण असावे, अशी मागणी करण्यात आली. दिव्यांग व क्रीडा प्रवर्गातील प्रमाणपत्रांची योग्य टप्प्यावर पडताळणी करण्याची सूचनाही करण्यात आली.

दरम्यान, पुढील एक वर्ष ऑनलाइन परीक्षा न घेता ओएमआर पद्धतीनेच परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे व्ही. राधा यांनी स्पष्ट केले. या कालावधीनंतर ओएमआर पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल. तसेच, ओएमआर पद्धतीच्या परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि एकसमान पद्धतीने घेण्यासाठी प्रमाणित नियमावली तयार करण्याचे काम सध्या सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

देशातील विविध लोकसेवा आयोगांच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करण्यात येत असून, तमिळनाडू, गुजरात आणि संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करून महाराष्ट्रासाठी उपयुक्त सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. विद्यार्थ्यांसह सर्व भागधारकांकडून मिळालेल्या सूचनांचा गांभीर्याने विचार करून परीक्षा प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व परिणामकारक केली जाईल, असे राधा यांनी सांगितले.

एमपीएससीवरील वाढती जबाबदारी लक्षात घेता आयोगाचे मनुष्यबळ, तांत्रिक क्षमता आणि संस्थात्मक रचना बळकट करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. अधिक गतिमान, पारदर्शक आणि उत्तरदायी अधिकारी निवड प्रक्रिया निर्माण करणे हे टास्क फोर्सचे उद्दिष्ट आहे, असे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी सांगितले.

यावेळी विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

## कंत्राटी कामगारांना योग्य उपचार मिळत असेल तर चौकशीची गरज नाही;...

**(पान १ वरून)** उपचाराशी संबंधित प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे अपेक्षित असते. कामगाराला उपचार मिळण्यासाठी संघटनेला अशा वेळी हॉस्पिटलमध्ये जाऊन संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा लागतो.

संघटना जाणूनबुजून हॉस्पिटलमध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यासाठी जात नाही. अलट, आमच्याशी वाद घालणे, आमचा मार्ग अडवणे, प्रवेश नाकारताना कोणताही लेखी आदेश न देणे, आमच्यावर खोटे अथवा अपमानास्पद आरोप करणे अशा परिस्थिती निर्माण झाल्यानंतर आमच्या स्वत:च्या सुरक्षिततेसाठी व वस्तुस्थितीचा पुरावा राहावा म्हणून व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे लागते.

भविष्यात आमच्यावर किंवा आमच्या प्रतिनिधींवर चुकीचे आरोप होऊ नयेत, तसेच आमच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ नये, यासाठी घटनास्थळी घडणाऱ्या प्रकारांचे रेकॉर्डिंग करणे ही आमची आवश्यकता आहे. म्हणून आमच्या पुढीलप्रमाणे मागण्या आहेत.

१) सौ.लक्ष्मी साबळे यांना चार दिवसांपासून Approval का मिळालेला नाही, याची तातडीने चौकशी करून त्यांना नियमानुसार उपचार सुविधा मिळवून द्याव्यात.

२) संघटनेला दिलेल्या Authorization Latter ची दखल घेऊन, संटनेच्या अधिकृत प्रतिनिधींना सभासदाच्या उपचारासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यास अनावश्यक अडथळा निर्माण करू नये.

३) श्री.माने व श्री.कांबळे यांनी संघटनेच्या प्रतिनिधींना प्रवेशबंदी कोणत्या आदेशाने केली, याची चौकशी करून संबंधित लेखी आदेश उपलब्ध करून द्यावा.

४) संघटनेच्या प्रतिनिधींवर कमिशन एजंट असल्याचे केलेले आरोप अत्यंत गंभीर असून, त्या आरोपांची सत्यता व संबंधित व्यक्तींची जबाबदारी निश्चित करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

५) भविष्यात संघटनेच्या प्रतिनिधींशी हॉस्पिटलच्या सिक्युरिटी किंवा बाउन्सर्सकडून थांबविण्याचे स्पष्ट निर्देश द्यावेत.

६) संघटनेचे प्रतिनिधी एखाद्या दाखल कामगाराच्या उपचारासंदर्भात अधिकृतपणे आले असल्यास, त्यांच्या प्रवेशाबाबत काही नियम किंवा निर्बंध असल्यास ते लेखी स्वरूपात देण्यात यावेत. तोंडी आदेश देऊन प्रतिनिधींना अडविण्याची पद्धत थांबवावी.

७) ESIC अंतर्गत पात्र कामगारांकडून नियमानुसार देय नसलेली रक्कम, अनावश्यक डिपॉझिट किंवा इतर शुल्क घेतले जात असल्यास त्याची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी.

८) ESIC Approval, Claim ID, Online Claim/Intimation व उपचारासंबंधी आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित हॉस्पिटल प्रशासनाची असल्याने, त्यामध्ये विलंब होऊन कामगाराला उपचारासाठी त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

९) दिनांक रोजी भारती हॉस्पिटलमध्ये घडलेल्या संपूर्ण घटनेचे सीसीटीव्ही फुटेज जतन करून त्याची चौकशीमध्ये तपासणी करण्यात यावी. तसेच उपलब्ध व्हिडिओ रेकॉर्डिंगचीही दखल घेण्यात यावी.

१०) सदर घटनेची निष्पक्ष चौकशी करून, दोषी व्यक्तींवर आवश्यक ती प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

११) भविष्यात आमच्या संघटनेच्या कोणत्याही अधिकृत प्रतिनिधीला कामगारांच्या उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर अशा प्रकारे अडवणूक, अपमान किंवा त्रास होणार नाही, याबाबत स्पष्ट लेखी हमी/निर्देश देण्यात यावेत. आम्ही स्पष्टपणे नमूद करू इच्छितो की, कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्य कोणत्याही बेकायदेशीर कृत्याचे समर्थन करत नाही. आम्ही केवळ कायदेशीर व लोकशाही मार्गाने कामगारांना त्यांच्या हक्काच्या सुविधा मिळवून देण्यासाठी कार्यरत आहोत.

त्यामुळे संघटनेच्या अधिकृत प्रतिनिधींना कमिशन एजंट अथवा इतर कोणत्याही अपमानास्पद शब्दांनी संबोधित करून संघटनेची बदनामी करण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही.

वरील संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, तसेच सौ.लक्ष्मी साबळे यांना ESIC नियमानुसार आवश्यक उपचार व Approval तातडीने मिळवून देण्यात यावे, ही विनंती.

## गणेशोत्सवात २२ रूग्णवाहिका, २५ बाइक रायडर्स...

**(पान १ वरून)** पोलिस स्टेशन, हुतात्मा बाबू गेनू मंडळ, कसबा गणपती मंडळ, केसरीवाडा, गरूड गणपती, टिळक रस्ता तसेच पुणे जिल्ह्यातील अष्टविनायक मंदिर परिसरात रूग्णवाहिका तैनात राहणार आहेत.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आमदार श्री.हेमंत रासणे, महानगरपालिका...

**(पान १ वरून)** रस्त्यांचे अपूर्ण समतलीकरण याबाबतही संबंधित विभागांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी संबंधित क्षेत्रीय कार्यालयांनी आपापल्या हद्दीतील खड्डे व खराब रस्त्यांची दुरुस्ती तातडीने पूर्ण करावी, तसेच पथ विभागाने या कामांवर प्रत्यक्ष देखरेख ठेवून दुरुस्तीची कामे दर्जात्मक पद्धतीने पूर्ण होतील याची खात्री करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

कसबा, मंडई आणि स्वारगेट मेट्रो स्टेशन परिसरातील मोठ्या प्रमाणातील गर्दीचा विचार करून या परिसरातील रस्ते सुस्थितीत व खड्डेमुक्त ठेवण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच पाणीपुरवठा, ड्रेनेज, महावितरण व इतर युटिलिटी विभागांनी गणेशोत्सव संपेपर्यंत नवीन रस्ते खोदाई टाळावी आणि पूर्वी करण्यात आलेल्या खोदाईची कामे पूर्ण करून रस्ते समतल करावेत, असे निर्देश देण्यात आले.

ड्रेनेज विभाग व संबंधित क्षेत्रीय कार्यालयांनी मुख्य वाहिन्यांची पाहणी करून गळती व तुंबलेल्या वाहिन्या तातडीने दुरुस्त कराव्यात, तर महावितरण व विद्युत विभागाने उघड्या तारा सुरक्षित कराव्यात आणि पादचाऱ्यांना अडथळा ठरणाऱ्या डीपी बॉक्सबाबत आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या.

गणेशोत्सवाच्या कालावधीत शहरात मोठ्या प्रमाणावर नागरिक व भाविकांची गर्दी होत असल्याने वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी महापालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने समन्वयाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असेही यावेळी निर्देशित करण्यात आले.

यावेळी मुख्य अभियंता (पथ विभाग), श्री.राजेश बनकर, मुख्य अभियंता (विद्युत विभाग), श्रीमती मनीषा शेकटकर, उपायुक्त, अतिक्रमण विभाग, सोमनाथ बनकर, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग, श्री.संतोष वारुळे, अधीक्षक अभियंता, पथ विभाग श्री.रोहिदास गव्हाणे, सहाय्यक महापालिका आयुक्त, श्री.मुल्ला, सहाय्यक महापालिका आयुक्त, श्री.राजेश गुर्रम, तसेच महावितरणचे अधिकारी आणि महानगपालिकेचे संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

नियमित वाचा...
सा. संघर्षाचा आवाज